| MHSO200019592021 | **नियमित दिवाणी दावा क्र. ४३१/२०२१** |
|---|---|

## निशाण क्र. ३९ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी त्यांनी दिलेल्या कैफीयतीमध्ये दुरुस्तीस परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्जात प्रतिवादी यांचे कथन असे आहे की, प्रतिवादी यांनी कैफीयत कलम ४ मध्ये आवश्यक पक्षकार यांना दाव्यात समाविष्ट केलेले नाही असे नमूद केलेले आहे. परंतु, त्यापुढे स्पष्टपणे दाव्यात समाविष्ट करतेवेळी दाखल केलेल्या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेले विविध कार्यकारी सेवा सोसायटी, वाढेगाव यांना पक्षकार न केल्याचे कैफीयतीमध्ये नमुद करणे नजरचुकीने राहुन गेलेले आहे. प्रस्तुतचा दावा हा वाटपाचा असून दावा मिळकतीचे इतर अधिकारामध्ये नावे नमुद असलेल्या व्यक्तीनी सदरचा वाटपाचा दावा दाखल केलेला आहे. तथापी, इतर अधिकारात नावे नमुद असलेले सर्वांना पक्षकार केलेले नाही. त्यामूळे, प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या कैफीयतीमधील कॉलम क्र. ४ च्या पुढे 'वाढेगाव विविध कार्यकारी सेवा सोसायटी यांना पक्षकार केलेले नाही' असे लिहुन दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी. सदर दुरुस्तीमुळे मे. न्यायालयापुढे स्पष्टपणे खरी वस्तुस्थिती येणार आहे. सबब, कैफीयतीमध्ये वर नमुन केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

**३.** सदरच्या अर्जास वादीतर्फे म्हणणे देण्यात आले असून त्यात त्यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत अर्ज खोटा व लबाडीचा आहे. प्रस्तुत दाव्यात वादीने पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. असे असताना प्रतिवादी यांनी जाणूनबुजून दाव्याचे कामकाज प्रलंबित ठेवण्याच्या दुष्ट हेतुने सदरचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादी यांनी दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकी विविध कार्यकारी सेवा सोसायटी वाढेगाव यांना पक्षकार न

केलेचे कैफीयतीमध्ये नमुद करणे नजरचुकीने राहुन गेलेले आहे असे नमुद केलेले आहे. परंतु, कायद्याच्या तरतुदीप्रमाणे ७/१२ पत्रकी इतर हक्कात नोंद असलेल्या बँक बोजा संदर्भात अर्थसहाय्य करणाऱ्या संस्थेस पक्षकार म्हणुन समाविष्ट करण्याची दुरुस्ती करता येणार नाही. तसेच वादी यांनी दाखल केलेल्या वादी मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर विविध कार्यकारी सेवा सोसायटी, वाढेगाव यांचा कर्जबोजा नसल्याचे उतारे दाखल केलेले आहेत. प्रस्तुतचा अर्ज मंजूर झाल्यास दाव्याच्या मुख्य आशयात व विषयात बदल होऊन गुंतागुंत निर्माण होणार आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द सरस निरस मानाने वाटपाचा व पृथक कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यास प्रतिवादी क्र. १ ते ८ तर्फे नि.क्र. २४ खाली कैफीयत दाखल करण्यात आलेली आहे. नि.क्र. ३५ खाली माझे पूर्वाधिकारी यांनी प्रस्तुत दाव्याचे मुद्दे स्थापीत केले आहे. प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफीयत कलम ४ मध्ये प्रस्तुत दाव्यास आवश्यक पक्षकारांची बाधा येते असे नमूद केलेले आहे. प्रस्तुत अर्जामध्ये त्यांना सदर कलमामध्ये दावा दाखल करतेवेळी ७/१२ उताऱ्यावर इतर अधिकारात नमूद सर्वांना पक्षकार करण्यासाठी 'वाढेगाव विविध सह. सोसायटी' या संस्थेस आवश्यक पक्षकार करुन कैफीयत दुरुस्ती करण्याच्या कारवाईसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. वादीने प्रतिवादींच्या सदर दुरुस्तीस आक्षेप नोंदवत असे कथन केले आहे की, कायद्याच्या तरतुदीप्रमाणे ७/१२ पत्रकी इतर हक्कात नोंद असलेल्या बँक बोजासंदर्भात अर्थसहाय्य करणाऱ्या संस्थेस आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ट करण्याीच दुरुस्ती करता येणार नाही. तसेच, वादमिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर 'वाढेगाव विविध सह. सोसायटी' यांचा कर्जबोजा नसल्याचे उतारे त्यांनी दाखल केलेले आहेत. त्या पृष्टयार्थ वादी यांनी नि.क्र. ४२ सोबत गट क्र. २९७ व २९९ या मिळकतींच्या ७/१२ उताऱ्यांची संगणकीय प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदर ७/१२ उताऱ्यांचे अवलोकन केले असता त्यामध्ये वाढेगाव वि.का.से.सो.इ.प. बोजा असे नमूद असून त्यास कंस पडल्याचे निदर्शनास येते. तसेच, सदर कथनाच्या पृष्टयार्थ वादीतर्फे नि.क्र. ४६ सोबत फेरफार क्र. ७००८ दाखल करण्यात आला आहे. सदर फेरफारचे अवलोकन केले असता उपरोक्त नमूद संस्थेने दिलेला दि. ३०/०६/२०२३ रोजीच्या दाखल्यावरुन

मिळकत क्र. २९९ व २९७ च्या ७/१२ उताऱ्यावर दाखल असलेला बोजा कमी केला असल्याचे नमूद आहे. त्यावरुन सदर संस्थेचे नाव सदर उताऱ्यावरुन कमी झाल्याचे निदर्शनास येते. त्यामूळे, उपरोक्त नमूद संस्थेचा दावा मिळकतीवरील कोणताही हक्क तथा हितसंबंध राहीला नसल्याचे निदर्शनास येते.

**५.** कायद्याचे हे प्रस्थापीत तत्व आहे की, एखाद्या पक्षकाराच्या अनुपस्थितीत कोणताही प्रभावी आदेश पारीत केला जाऊ शकत नसल्यास सदर पक्षकार हा आवश्यक पक्षकार असतो. दाव्याचे स्वरुप पाहता उपरोक्त नमूद संस्था प्रस्तुत प्रकरणामध्ये सामील केलेस सदर संस्थेचा दावामिळकतीबाबत कोणताही हितसंबंध नसल्याकारणाने ती दाव्याच्या निर्गती करण्यासाठी आवश्यक पक्षकार नसल्याचे निदर्शनास येते. अशा परीस्थीतीत प्रस्तुतच्या वाटपाच्या दाव्यामध्ये उपरोक्त नमुद संस्थेची उपस्थीती कशी आवश्यक आहे ही बाब प्रतिवादी शाबित करु शकलेला नाही. सदर संस्थेची उपस्थिती प्रस्तुत दाव्यातील उभय पक्षकारांमधील वास्तवीक किंवा खरा वाद सोडविण्यासाठी आवश्यक नाही. त्यामूळे सदर संस्थेस पक्षकार केल्यास दाव्याची निर्गती करण्यास मदत होणार नसून उलट दाव्याच्या कामकाजास अनावश्यक विलंब होईल. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करणे न्यायोचित राहील. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2026.01.29 12:33:21 +0530

दिनांक – २८/०१/२०२६.

**(एस. एस. साळुंखे)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

**प्रमाणपत्र**

मी खात्री देतो की, सदर आदेशाच्या / न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ आदेश / न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | २ रे सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, सांगोला. |
| आदेश / न्यायनिर्णयाचा दिनांक | : | २८/०१/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | २९/०१/२०२६ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | २९/०१/२०२६ |